ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण

वर्ष : १२ वे । अंक २ रा
जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर - २०२१



# लोककवी वामनदादा कर्डक विशेषांक

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १२ वे, अंक – दुसरा: जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२१

**UGC Care Listed Journal**
**ISSN 2231 - 573X**

● संपादक ●

**डॉ. शिवाजी हुसे**

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३.
मो. ९९०४००३९९८

| | | |
|---|---|---|
| 32. | वामनदादा कर्डक : आंबेडकरी चळवळीतील लोकप्रिय जलसेकार<br>- प्रा. डॉ. उज्ज्वला एस. जगताप | 137 - 139 |
| 33. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान<br>- डॉ. संदीप अर्जुनराव बनसोडे | 139 - 143 |
| 34. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील स्त्री<br>- प्रा. डॉ. ज्ञानेश्वर सखाराम गवळीकर | 144 - 146 |
| 35. | महाकवी वामनदादा कर्डक आणि आंबेडकरी तत्वज्ञान<br>- प्रा. डॉ. भुजंग पाटील | 147 - 150 |
| 36. | महाकवी वामनदादा कर्डक आणि सामाजिक सुधारणा<br>- प्रा. डॉ. एस. पी. घायाळ | 151 - 154 |
| 37. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान<br>- प्रा. बालासाहेब विष्णू कटारे | 155 - 157 |
| 38. | वामनदादा कर्डक : लोककवी ते महाकवी<br>- डॉ. प्रतिभा वाघमारे-खोब्रागडे | 158 - 164 |
| 39. | वामनदादा कर्डकांची बुद्धगीते<br>- डॉ. विलास गुलाबराव गजभे | 165 - 171 |
| 40. | मानवतेचा उद्घोष करणारा गीतकार वामनदादा कर्डक<br>- प्रा. डॉ. सूर्यकांत आजगावकर | 172 - 176 |
| 41. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील (गीतातील) आंबेडकरी तत्वज्ञान<br>- सचिन बाबुराव मुंडे | 177 - 179 |
| 42. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञानाचे स्वरूप<br>- डॉ. रमेश औताडे | 180 - 185 |
| 43. | बाबासाहेबांचा विचार तळागाळात रुजविणारा महाकवी : वामनदादा कर्डक<br>- डॉ. अनंता सूर | 186 - 190 |
| 44. | वामनदादा कर्डक यांच्या काव्यातील शैक्षणिक विचार<br>- डॉ. महादेव शरद चव्हाण | 191 - 195 |
| 45. | वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान<br>- डॉ. प्रताप गायकवाड | 196 - 201 |
| 46. | लोककवी वामनदादा कर्डक यांची महिला गीते<br>- प्रोफेसर डॉ. रामनाथ गंगाधर वाढे | 202 - 205 |
| 47. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान<br>- प्रा. डॉ. मनोज मुनेश्वर | 206 - 207 |
| 48. | महाकवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता<br>- प्रा. हनुमान रामभाऊ खेत्री | 208 - 210 |



# लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान

- डॉ. संदीप अर्जुनराव बनसोडे
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख,
र.भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई, जि. बीड.

महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा जर आपण बघितली तर आपल्या लक्षात येते जे जे म्हणून उत्तम उदात्त व सुंदर आहे त्याचे जतन सांस्कृतिकतेच्या रूपाने मग तो एखादा पोवाडा असेल एखादी छक्कड असेल किंवा अगदी एखादी लावणी असेल, लोकगीत असेल किंवा भारूड, वासुदेव, लोकनाट्य, किंवा अगदीच ती साधी आणि सोपी कविता असेल परंतु या सर्वांच्या माध्यमातून जे-जे उत्तम, उदात्त, उन्नत व सुंदर आहे जे जे मानवाच्या हिताचे आहे ते ते सर्व जतन करण्याचा प्रयत्न येथील धर्म संस्कृतीने केलेला आपल्याला दिसून येतो. यातला आपण जर जरा... धर्म बाजूला केला, तर उरते केवळ संस्कृती आणि याच संस्कृतीचे होते सांस्कृतिक जतन याच जतनातून जोपासली जाते ती निव्वळ कला. कला जिला जात नसते, धर्म नसतो, ठोकळ असा आकार नसतो, उकार नसतो असते फक्त सौंदर्य आणि याच कलेच्या माध्यमातून जपली जातात माणसांची मने, पेरले जातात स्वाभिमान जागवणारे विचार. या सर्व कलांमध्ये जलसा हा एक प्रकार सातत्याने एकोणिसाव्या शतकात पासून नावारूपाला आलेला आपल्याला दिसतो नेमका हा जलसा म्हणजे तरी काय? या जलसाची परंपरा काय? नेमके जलसा कोणाला किंवा कोणत्या कलेला म्हणावे? त्याची व्याख्या कोणती या सर्व बाबींचा थोडक्यात विचार आपण प्रस्तुत लघुशोधनिबंधात करणार आहोत. आणि हा विचार करत असताना लक्षात येते की, डॉ. आंबेडकर या दीपस्तंभापासून प्रेरणा घेऊन जन्मलेले हे जलसे दलित समाजरूपी 'मूकनायकाच्या भावभावनांचे दर्शन घडवितात.'आंबेडकरी जलसा या संज्ञेच्या ज्या अनेक व्याख्या अभ्यासकांनी केलेल्या आहेत. त्या व्याख्यांमधील प्रमुख सूत्र आंबेडकरी चळवळ आणि आंबेडकरी तत्त्वज्ञान हेच मानलेले दिसते.

कवी गोपाळबाबा वलंगकर, भीमराव कर्डक, किसन फागुजी बनसोडे, शिवराम जानबा कांबळे, हरिभाऊ तोरणे, गणेश आकाजी गवई-सिरसाळ, शाहीर भाऊ फक्कड, रामचंद्र हरी बनसोडे, उद्धव रामाजी रामटेके, बळीराम बुवाजी कदम, श्रीपती सटवा अडसूळ, गणपत देवबा कदम, बलभीम दाजी कदम, रामा नामा खरगुळे अशी परंपरा दिसून येते.

जलसा हा कलाप्रकार प्रामुख्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार सर्वसामान्यांसमोर ठेवण्यासाठीच निर्माण झाला असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. बाबासाहेबांचे म्हणणे सामान्य दलितजनांना त्यांच्याच बोलीभाषेतून हसत खेळत समजावून सांगणारे दृश्याविष्कार म्हणजे हे जलसाकार होत. अशी ढोबळमानाने आपल्याला व्याख्या करता येईल. तरी काही मान्यवरांच्या व्याख्या आपण पाहू. आद्य आंबेडकरी जलसाकार भीमराव करडक आंबेडकरी जलशांची व्याख्या करताना म्हणतात, 'जलसा म्हणजे अस्पृश्यांच्या माणुसकी हक्कांचा साद्यंत इतिहास होय' आणखी एका ठिकाणी जलशाची तात्विक व्याख्या करताना ते म्हणतात, ' बाबासाहेब आंबेडकर राजकीय बैठकीवरून जो बहुमोल उपदेश करीत, जो संदेश देत, त्या

संदेशाचा आणि उपदेशाचा अनुवाद म्हणजे जलसा होय." आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ अभ्यासक अप्पासाहेब रणपिसे यांनी आंबेडकरी जलशाची सादरीकरणाच्या अंगाने एक व्याख्या अशी केली आहे की, 'प्रथम वाद्य, संगीत, बाजा, झाल्यावर गण, गवळणी ऐवजी प्रारंभी भीमवंदना म्हणून, सरळ, सोप्या भाषेत, विनोदी विरोधाभासाची डूब देऊन परगुती [illegible] समाजप्रबोधन करणारे, नाचणाऱ्या नाची शिवाय, बाजारपणा नसणारे नवतमाशे म्हणजे आंबेडकरी जलसे होत."

ज्येष्ठ जलसाकार केशव सुका आहेर आंबेडकरी जलशाची व्याख्या करताना म्हणतात, "ज - जल. जल म्हणजे पाणी म्हणजे जल - सा याचा अर्थ पाण्यासारखा समान, सर्व समावेशक, समतेच्या पातळीवर आणि समतेचाच संदेश देणारा तो जलसा' असे म्हटले आहे तर डॉ. गंगाधर पानतावणे यांनी दलित शाहिरीचे प्राणतत्त्व सांगताना केलेले विधान देखील आंबेडकरी जलशाची एक व्याख्या होऊ शकते. ते म्हणतात, 'स्वातंत्र्य, प्रज्ञा, समता, न्याय आणि आत्मतेज या तत्त्वांनी अनुस्यूत असलेली आंबेडकरी मानसिकता म्हणजे आंबेडकरी शाहिरी होय" तर डॉ. कृष्णा किरवले आंबेडकरी जलशाची व्याख्या करताना म्हणतात, 'जलसा ही तमाशाच्या अंगानेच अभिव्यक्त होणारी लोकजागर कला आहे.' एकंदरीत अस्पृश्यांच्या माणुसकीहक्कांचा साद्यंत इतिहास म्हणजे जलसा. समतेचा संदेश देणारा तो जलसा. तर डॉ. शरणकुमार लिंबाळे म्हणतात, 'जलशाचे प्रगत रूप म्हणून दलित पथनाट्याकडे पाहता येईल. इतकेच नव्हे तर दलित साहित्याच्या उदयापूर्वीची पहाट म्हणूनही आंबेडकरी जलशांचा उल्लेख करता येईल"

समाजप्रबोधन करणारा नवतमाशा म्हणजे जलसा, आंबेडकरी मानसिकतेचे कलारूप म्हणजे जलसा, लोकजागर कला म्हणजे जलसा, कलावंत कार्यकर्त्यांनी सादर केलेली लोककला म्हणजे जलसा, आंबेडकरी साहित्याची सांस्कृतिक धरोहर म्हणजे जलसा. अशा आशयाचा समावेश व्याख्या अनेकांनी केलेल्या दिसतात. या सर्व व्याख्या पाहिल्यानंतर आंबेडकरी जलसाकारांचा विचार करताना एक गोष्ट लक्षात येते की सर्व आंबेडकरी जलसेकार हे स्वाभाविकपणेच आंबेडकरी शाहीरही होते. कारण जलशात गद्य संवादासोबतच गाणी, पोवाडे, लावणी, पदे आणि कविता या सुद्धा असत. प्रत्येक आंबेडकरी शाहीर गीतकारकार हा आंबेडकरी जलसाकार नव्हता, परंतु तो जोपासत असलेली कला मात्र जलशाच्या जवळ जाणारी अशा स्वरूपाची होती. म्हणजेच कालांतराने जलशाचे रूप बदलून गीतरचना केली जाऊ लागली आणि गाण्याच्या रूपाने ती सर्वसामान्यांसमोर चालबद्ध पद्धतीने सादर केली जाऊ लागली हे सादरीकरण महिला वर्गाबरोबरच पुरुष मंडळींना सुद्धा आकर्षित करणारे होते.

जलसेकारांची पहिली पिढी दुसरी पिढी आणि तिसरी पिढी उदयाला येऊ लागली मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा वारसा सर्वसामान्यांपर्यंत लोकभाषेत मांडण्याचा प्रवाह काही थांबला नाही, याच प्रवाहात तिसऱ्या पिढीत म्हणजेच १९४५ च्या नंतर वामनदादा कर्डक यांची कलापथके गायन पार्टी या मोठ्या प्रमाणात उदयाला आल्या.

वामनदादांनी डॉ. आंबेडकरांचे मूलभूत विचार आपल्या साध्या सोप्या आणि मार्मिक अशा लोकभाषेतून सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवले डॉ. आंबेडकर यांचा दलित मुक्तीचा लढा वामन दादांनी आपल्या गीतातून हुबेहूब उभा केला कारण वामनदादा यांना माहीत होते की सामाजिक बदल अपेक्षित असेल तर आंबेडकरी विचारांची गरज आहे आणि त्यासाठी चळवळ महत्त्वाची असून अशा आंबेडकरी चळवळीला खतपाणी घालण्याच्या उद्देशाने सर्व धर्मीयांचे वैचारिक प्रबोधन होणे गरजेचे आहे हीच इच्छा डॉ. आंबेडकरांची सुद्धा होती हे जाणून समाजव्यवस्थेने नाकारलेल्या वर्गाचे प्रतिनिधित्व करणारी चळवळ ही खऱ्या अर्थाने मानव मुक्तीची चळवळ होती या चळवळीतून माणूस तयार होणार होता आणि म्हणून आपणही दलितांचे प्रबोधन करावे ही एकात्मिक इच्छा सामाजिक बांधिलकी पोटी त्यांच्या मनामध्ये रूजली आणि डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर जी एकूणच दलित समाजाची प्रगती खुंटली होती त्या प्रगतीला आंबेडकरांच्या विचारांचे पुन्हा एकदा पुनरुज्जीवन देण्याचे कार्य वामन दादांनी अविरतपणे केल्याचे दिसून येते हे करत असताना डॉ आंबेडकर यांच्या निधनानंतर जी चळवळ होती ती गटातटात विखुरलेल्या गेली ही गोष्ट वामनदादा च्या मनात सातत्याने सलत होती आणि म्हणूनच त्यांची लेखणी खंत व्यक्त करत बोलू लागली की,

' भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते. .
तलवारीचे तयांच्या न्यारेच टोक असते. ... ।।धृ।।

तत्वाची जाण असती, बिन डोक लोक नसते.
सारे चलन तयांचे , सब रोख ठोक असते. '

नुसती एकाच गीतातून वामनदादा खंत व्यक्त करत नाहीत तर अतिशय तीव्र शब्दांमध्ये दलित राजकीय नेत्यांचीयांना पुढारी म्हणतात अशा पुढाऱ्यांची कुठलीही भाड भीड न बाळगता कुणालाही न घाबरता ते एके ठिकाणी म्हणतात, '

'॥डोकी कशाची ती रिकामीच खोकी
बुडाल गटाच्या गटारीत वामन,
वदे हेच आता नवे गीत वामन ॥
॥बुडाली आता हीच तुझी चार डोकी
नसे मान तुला चार लोकी.... ॥' '

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कम्युनिस्ट असोत किंवा काँग्रेस असो यांची ध्येयधोरण अजिबात मान्य नव्हती, काँग्रेसच्या बाबतीत तर बाबासाहेब म्हणत,' काँग्रेस हे जळतं घर आहे आणि तोच धागा वामनदादा पकडून वामनदादा लिहितात,

' ज्या दिशेला नाही सखा रे
त्या दिशेला जाऊ नका रे..... ॥धृ॥
जिने भीम शक्ती खुळी काल केली
खुळी काल केली लुळी काल केली,
तोंड तिचे पाहू नका रे ..... ॥१॥
त्या दिशेला जाऊ नका रे .....'

डॉ. आंबेडकरांनी दलितांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क दिला स्वतंत्र भारताच्या लोकशाहीमध्ये मानाचा तुरा म्हणून भारतीय संविधानाला ओळखले जाते या संविधानाचे लेखन करणाऱ्या डॉ. आंबेडकरांनी प्रत्येक माणूस हा माणूस म्हणून जगला पाहिजे हेच विचार सातत्याने लोकांच्या मस्तकी पेरले आणि जो कालपर्यंत जनावरांपेक्षा ही हीन वागणूक मिळत असलेला माणूस होता तो आता आनंदाने राहू लागला या आनंदाला पारावार पुरेनासा झाला आणि म्हणून अशा या आनंदात वामनदादा म्हणतात,

॥ लयास गेली युगायुगाची हीनदीन अवकळा ॥
॥ पहा पहा मंजुळा हा माझ्या भिमरायाचामळा॥

मात्र पुढे दलित पुढाऱ्यांचे पुढे दलित चळवळीमध्ये खच्चीकरण होऊ लागले, इतर राजकीय पक्ष हे मोठ्या प्रमाणात गट-तट निर्माण करण्यात यशस्वी होऊ लागले. दलित पुढारी फक्त स्वतःचे हित बघू लागले. अशा या स्वाभिमान गमावणाऱ्या पुढाऱ्यांचा साठी वामनदादांची लेखणी म्हणते,

' कोण राखील आता भीमाचा मळा
जाळुनी चाचला हा उभा जोंधळा
शेत मोडून जाता धनी मावळा
मोनियाच्या स्थळ पातळी अवकळा ॥धृ॥'

उदात्त ध्येय डोळ्यासमोर ठेवून डॉ. आंबेडकरांनी अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली, मात्र त्यांचे उदात्त ध्येय कार्यकर्त्यांनी जपले नाही, स्वतःच्या स्वार्थापायी दलालांच्या दावणीला कार्यकर्ते बांधले गेले आणि म्हणूनच या तीव्र वेदनेतून वामन दादांनी गीत लिहिले,

' काल भीमाच्या क्रांतीचे तुम्हीच बारा वाजविले
अज्ञान साऱ्या बाळांनी, षांढाळांनी नपुंसकाला लाजविले
वामनवाणी लुटाऱ्यांनी ,गल्ली गल्लीच्या कुत्ऱ्यांनी भांडण सारे माजविले ....'

वेदना, विद्रोह, नकार आणि चीड ही आंबेडकरी प्रेरणेतून साकार झालेल्या कवितेची वैशिष्ट्ये आहेत या वैशिष्ट्यांचा प्रत्यय

वामनदादांच्या गीतरचनेतूनही येतो. चीड हे कर्डकांच्या गीतरचनेचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे.

मात्र केवळ चीड हीच त्यांच्या गीतांचा हेतू नाही तर फक्त आणि फक्त वर्षानुवर्षे दबलेला सवर्णांनी नाकारलेला माणूस हा स्वाभिमानाने शिक्षण घेऊन जगला पाहिजे, त्याने इतरांना जगवले पाहिजे, हाच विचार त्यांच्या गीतातून नेहमीच दिसून येतो म्हणजेच वामनदादा कर्डक यांची लेखणी ही केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रबोधनपर विचार मांडताना दिसून येते मग हे विचार मांडताना तो आनंदाचा क्षण असो किंवा दुःखाचा किंवा अगदी राजकीय चीड निर्माण करणारा आंबेडकरांचे प्रबोधनपर विचार साध्या सोप्या आणि सरळ भाषेमध्ये माझ्या समाज बांधवांना समजले पाहिजेत उमगले पाहिजेत आणि त्या विचारांची कास धरून एखादा तरी डॉ. आंबेडकर पुन्हा या धरतीवर उदयाला आला पाहिजे अशीच जणू इच्छा वामनदादांच्या गीतातून व्यक्त करतात असे दिसून येते.

**संदर्भ टीपा**


१) विटाळ विध्वंसन - गोपाळबाबा वलंगकर, पुरोगामी सत्यशोधक, जुलै ऑगस्ट-सप्टेंबर १९७९

२) वादळाचे वंशज - डॉ. गंगाधर पानतावणे, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, १९८२

३) आंबेडकरी साहित्य संप्रदायाचे समालोचन- अप्पा रणपिसे, पृ. ४०

४) आंबेडकरी शाहिरी : एक शोध - डॉ. कृष्णा किरवले, प्रस्तावना

५) आंबेडकरी जलसा - शरणकुमार लिंबाळे, लोकायन, विशेषांक, नाशिक, १९९५

६) आंबेडकरी जलसे - स्वरूप व कार्य - भीमराव करडक

७) वामन कर्डक, मोहोळ, आनंद प्रकाशन औरंगाबाद ऑक्टो.१९९६

८) वामन कर्डक माझ्या जीवनाचं गाणं, शब्दांकन रविचंद्र हडसनकर, निर्मल प्रकाशन, १९९६

९) अशोक डोंगळे, आंबेडकरी प्रतिभेचा महाकवी वामनदादा कर्डक, प्रतिभास प्रकाशन परभणी २००४

१०) मसुम अचलखांब बाबासाहेब आंबेडकरांचे ग्रंथ लेखन स्वरूप प्रकाशन२००४


*****